

*चिखलदरा–* हे छायाचित्र धामणगाव गढी ते चिखलदरा घाटातील असून रविवारी कोंडीमूळे नागमोडी घाट वळणात अडकलेल्या वाहनांची रांग स्पष्टपणे दिसत आहे. जवळपास सहा ते आठ तास पर्यटक या घाटात आपल्या वाहनांसह अश्याप्रकारे अडकून पडले.

# चिखलदरा हाऊसफुल्लः सहा किलोमीटरपर्यंत पर्यटकांच्या रांगा

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.13 )–** विदर्भाचं नंदनवन समजलं जाणारं चिखलदरा सध्या पर्यटकांनी गजबजलेलं आहे. मागील तीन दिवसांपासून विशेषत: रविवारपासून येथे पर्यटकांची पुन्हा गर्दी पाहायला मिळाली. धामणगाव गडी ते चिखलदरा या मार्गावर सहा किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. येण्यास धामणगाव मार्ग वापरण्यात येत असून, घटांग मार्गाने परतीसाठी पर्यटक मार्गस्थ होत आहेत.

या प्रचंड गर्दीमुळे चिखलदरा नगरपालिकेच्या तिजोरीत लाखोंचा कर जमा झाला असून, स्थानिक हॉटेल्स, दुकाने, फेरीवाले यांचा व्यवसाय देखील तेजीत आहे. अनेक पर्यटक अर्धा दिवस आधीपासूनच हॉटेल बुकिंग करून येत आहेत, त्यामुळे हॉटेल व्यवसाय फुला फुलात असून, स्थानिक व्यापाऱ्यांच्या हाती भरपूर पैसे खेळत आहेत. चिखलदराचे आल्हाददायक हवामान, हिरवेगार निसर्गदृश्य आणि थंड हवामान पर्यटकांना भुरळ घालत आहे. प्रमुख पर्यटन स्थळांमध्ये भीमकुंड, पंचबोल, गाविलगड किल्ला, देवी पॉईंट, शासकीय वनउद्यान, हरिकेन पॉईंट, जत्राडोह, शिवसागर पॉईंट यांचा समावेश होतो. विशेषत: भीमकुंड पॉईंटवर सर्वाधिक गर्दी दिसून येत आहे. नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातूनही पर्यटक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. चिखलदराचा पर्यटन हंगाम सध्या आपल्या शिखरावर असून, स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा बळकटी मिळत आहे.

### अनेक किलोमीटर पैदल प्रवास

पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना हे चिखलदरा चे पर्यटन डोकेदुखी ठरली. वाहतुकीच्या कोंडीमध्ये अडकल्याने त्यांना वाहनं चालकाकडे सोडून अनेक किलोमीटर पायदळ प्रवास करावा लागला. अनेकांसाठी हा अनुभव कटू ठरला, तर काहींनी मौजमस्तीचा आनंद उचलला.

## ठाणेदारासोबत हुज्जतबाजी, महिला पोलीसांशी धक्काबुकी

### पोलिस ठाण्यात गोंधळ घालणार्या दोघांविरुद्ध गुन्हा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )–** वलगाव पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेल्या ठाणेदारासोबत हुज्जतबाजी करून, एका महिला पोलीस कॉन्स्टेबलला ढकलणे, शिवीगाळ करणे आणि सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका महिलेसह पुरुषावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना 12 जुलै रोजी सायंकाळी 6 वाजता वलगाव पोलीस ठाण्यात घडली.

वलगाव पोलिस ठाण्यातील महिला पोलीस हवालदार धनिष्ठा शंकरराव शिरभाते (34) या गेल्या महिन्याभरापासून वलगाव पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत आहेत. त्या 12 जुलै रोजी सायंकाळी 2 ते रात्री 9 या वेळेत वायरलेस ड्युटीवर होत्या. सायंकाळी 6 वाजताच्या सुमारास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश पानसरे यांच्या कक्षात एक महिला व पुरुष हे जोरजोरात ओरड होते. त्यामुळे पोलिस निरीक्षक राजेश पानसरे यांनी बेल वाजवून महिला पोलिस धनिष्ठा शिरभातेंना आपल्या कक्षात बोलाविले. त्यावेळी त्या पोलिस निरीक्षकांच्या कक्षात गेल्या असता, तेथे एक महिला आणि अरविंद सुधाकर चारथळ (वय 35, दोघेही रा. आष्टी, जि. अमरावती) हे मोठ्या आवाजात आरडाओरड करत गोंधळ घालत होते. जप्त केलेली कुर्हाड मला आताच पाहिजे, असे म्हणून, ते दोघेही पोलिस निरीक्षकांसोबत वाद घालत होते. जप्त केलेली कुर्हाड ही न्यायालयाच्या आदेशाने सुपुर्द करता येते, असे पोलिस निरीक्षक समजावून सांगत होते. परंतू महिला व अरविंद चारथळ हे दोघेही काही न ऐकता जोरजोरात शिविगाळ करून ठाणेदारांच्या अंगावर जात होते. हा प्रकार पाहून महिला पोलिस हवालदार धनिष्ठा शिरभाते यांनी महिलेला अडविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या महिलेने हवालदार शिरभाते यांनाच लोटलाट केले आणि हातातील मोबाईल फेकून मारला. तसेच चारथळ यानेही तेथे उपस्थित एएसआय संजय काळेंना शिविगाळ करीत म्हटले की, मी पोलिसांना पाहून घेईन, आता काय करतो तुम्हा पहा. त्यानंतर ते महिला व अरविंद हे दोघेही तेथून निघून गेले. या घटनेनंतर महिला पोलीस धनिष्ठा शिरभातेंनी वलगाव पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली. त्यानुसार जयश्री नामक महिला आणि अरविंद चारथळ या दोघांविरोधात शासकीय कामता अडथळा निर्माण केल्याच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लोखंडी कोयता, चाकूची दहशत पसरविणाऱ्यांना अटक



### गाडगेनगर पोलिसांची सलग दोन कारवाई
### परिसरातील दहशतीला लगाम

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )–** शहरातील गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँच (डी.बी.) पथकाने रात्रगस्ती दरम्यान दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये कोयता आणि चाकूसह संशयितांना अटक करून परिसरात भीतीचं वातावरण निर्माण करणाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या. या कारवायांमुळे नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला आहे.

पहली कारवाई ङ्क संजीवनी कॉलनीत दहशत

13 जुलै रोजी रात्री गस्त घालत असताना डी.बी. पथकाला माहिती मिळाली की संजीवनी कॉलनी, राठी नगर परिसरात दोन इसम हातात कोयता व चाकू घेऊन नागरिकांना धमकावत होते. तात्काळ कारवाई करत पोलिसांनी सुरज किशोर चव्हाण (वय 20) याच्याकडून 18 इंच लांबीचा लोखंडी कोयता, तर प्रमोद रामभाऊ पाटील (वय 45) याच्याकडून 8 इंच लांबीचा स्टीलचा चाकू जप्त केला. दोघांविरोधात आर्म्स ॲक्ट व 135 मुंबई पोलीस अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

### दुसरी कारवाई – भीमनगरमध्ये छापा

त्यानंतर मिळालेल्या माहितीच्या आधारे भीमनगर भागात छापा टाकण्यात आला. यामध्ये आकाश साहेबराव वानखडे (वय 28) याच्याकडून 15.6 इंच लांबीचा कोयता जप्त करण्यात आला. याच्यावरही तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे आणि सहायक आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक अतुल वर, पीआय विजया पंधरे, पीआय समाधान वाठोरे आणि डी.बी. पथकातील कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे ही कारवाई यशस्वी झाली.

## विधिसंघर्षित बालक निरीक्षणगृहातून पळाला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.13 )–** रुक्मिणीनगर येथील शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालगृहातून एका 16 वर्षीय विधिसंघर्षित बालकाने पलायन केल्याची घटना घडली. सदर मुलाला फ्रेजरपुरा पोलिसांनी दरोड्याच्या गुन्ह्यात ताब्यात घेतले होते.10 जुलै रोजी सायंकाळी सुमारे 4.50 वाजता ही घटना उघडकीस आली. त्याने ड्युटीवर असलेले सुरक्षा रक्षक रावसाहेब चौरपगार (27, रा. चंडिकापूर) यांना धक्का देत पळ काढला. त्या वेळी काळजीवाहक रजेवर होते आणि केवळ दोनच सुरक्षा रक्षक कर्तव्यावर होते.11 जुलै रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधित मुलगा यापूर्वीही वारंवार गुन्हे करत असल्याने त्याला निरीक्षणगृहात ठेवण्यात येत होते, अशी नोंद फिर्यादीत करण्यात आली आहे. या प्रकारामुळे निरीक्षणगृहातील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## खनिकर्मच्या बाधित गावांसाठी 6.61 कोटींचा निधी मंजूर

### 8 तालुक्यांतील 22 गावांमध्ये होणार 29 विकासकामे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )–** जिल्ह्यातील खनिकर्ममुळे बाधित झालेल्या गावांच्या विकासासाठी खनिकर्म प्रतिष्ठानच्या माध्यमातून यंदा 6 कोटी 61 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून अमरावती जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील 22 गावांमध्ये 29 विविध विकासकामे हाती घेण्यात येणार आहेत. या कामांना प्रत्यक्ष बाधित गावांना प्राधान्य देण्यात आले आहे. गिट्टी खदानी, वाळू घाट आदी खनिकर्मांमुळे वाहतूक वाढून नागरिकांना होणारा त्रास, रस्त्यांचे नुकसान आणि प्रदूषणाचा फटका बसतो. त्यामुळे अशा गावांमध्ये आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पाणीपुरवठा, पर्यावरण संरक्षण यांसारखी महत्त्वाची कामे करण्यासाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जातो. या निधीच्या नियोजनात 5 कोटी 18 लाख रुपये प्रत्यक्ष बाधित गावांसाठी तर 1 कोटी 32 लाख रुपये अप्रत्यक्ष बाधित गावांसाठी मंजूर करण्यात आले आहेत.

## मणिपुरम गोल्ड लोन बँकेला आग

### अग्निशमन विभागाच्या तत्परतेने टळले 50 लाखांचे नुकसान

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )–** जयस्तंभ चौकातील मणिपुरम गोल्ड लोन बँकेला रविवारी सकाळी अचानक आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अमरावती महापालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेतल्यामुळे सुमारे 50 लाखांचे संभाव्य नुकसान टळले.

ही घटना 13 जुलै रोजी सकाळी 8.45 वाजता घडली. बँकेचे व्यवस्थापक मनीष माहुरे यांनी आग लागल्याची माहिती अग्निशमन नियंत्रण कक्षाला दिली. त्यानंतर केंद्रप्रमुख सोनकांबळे यांच्या निर्देशाने अग्निशमन बंब तत्काळ पाठविण्यात आला. चालक नितीन इंगोले व फायरमन अमोल साळुंखे, निशांत राठोड यांनी वेळेवर पोहोचून आग आटोक्यात आणली.

शॉर्टसर्किटमुळे सीसीटीव्ही यंत्रणेने पेट घेतल्याचे निदर्शनास आले. तत्काळ वीजपुरवठा बंद करून पाण्याचा मारा करण्यात आला. धुरामुळे स्मोक डिटेक्टर वापरण्यात आला व दुसरी फायर लॉरी देखील मागविण्यात आली. या गाडीवर निलेश देवकर (चालक) आणि फायरमन रोशन आरुडे यांनी काम केले.

या आगीत बँकेचे अंदाजे 50 हजार रुपयांचे नुकसान झाले असले तरी, श्री बालाजी रिअल इस्टेट, आदित्य बिर्ला म्युच्युअल फंड आणि मणिपुरम गोल्ड लोन या कार्यालयांचे सुमारे 50 लाखांचे नुकसान टळले.फायरमन अमोल साळुंखे, निशांत राठोड, रोशन आरुडे, राहुल घोडे आणि वाहन चालकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. अग्निशमन विभागाच्या तत्परतेचे नागरिकांनी कौतुक केले आहे.



## अमरावती शहरात तिसरा डोळा

### लवकरच लागणार 500 सीसीटीव्ही कॅमेरे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 ) –** अमरावती शहराच्या सुरक्षेसाठी आता नवीन डिजिटल पावले उचलली जात आहेत. शहरातील विविध भागांमध्ये एकूण 500 सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार असून, यासाठीचा प्रस्ताव राज्य सरकारने मंजूर केला आहे. पोलिस आयुक्तालयाच्या पुढाकाराने तयार करण्यात आलेल्या या योजनेतून शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा अधिक चांगल्या प्रकारे मागोवा घेता येणार आहे.

या प्रकल्पाअंतर्गत 220 ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे तर 14 ठिकाणी नंबर प्लेट ओळखणारी (एनपीआर) यंत्रणा बसवण्यात येणार आहे. यामुळे वाहतूक नियंत्रण, चोरी आणि गुन्हेगारी थांबवण्यास मदत होईल. अनेक वेळा गुन्हेगार पळून जातात, पण सीसीटीव्ही फुटेजमुळे पोलिसांना त्यांचा मागोवा घेणे सोपे जाईल.

> शहरातील सुरक्षेसाठी आम्ही हा प्रस्ताव तयार करून सरकारकडे पाठवला होता. मंजुरी मिळाल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होईल.
> **–अरविंद चावरिया,**
> पोलिस आयुक्त अमरावती.

अमरावती शहर झपाट्याने वाढत असून, लोकसंख्याही वाढते आहे. त्यामुळे पोलिसांसाठी शहरावर लक्ष ठेवणे कठीण जात होते. गेल्या काही वर्षांपासून सीसीटीव्हीची गरज जाणवत होती. पोलिस आयुक्तालयाने संपूर्ण शहराची पाहणी करून हा प्रस्ताव तयार केला आणि सरकारकडे पाठवला. आता त्याला मंजुरी मिळाल्यामुळे लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होईल आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल.

### सीसीटीव्ही कॅमेरे कुठे बसवले जाणार ?

–महत्त्वाचे चौक व रस्ते
–बाजारपेठा
– धार्मिक स्थळे
–शाळा व महाविद्यालय परिसर
–बस स्थानके व रेल्वे स्टेशन
– व्हीव्हीआयपी परिसर
– निवासी भाग

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

## चोरीची मोटरसायकल विक्री करताना अट्टल गुन्हेगार अटकेत

### अमरावतीत स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )–** तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीस गेलेली मोटरसायकल विक्रीसाठी अमरावतीत घेऊन आलेल्या अट्टल गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणच्या पथकाने अटक केली. आरोपीकडून 15 हजार रुपये किमतीची सीडी डिलक्स मोटरसायकल जप्त करण्यात आली आहे.11 जुलै रोजी गजानन देशकर (रा. सातरगाव, ता. तिवसा) यांनी तिवसा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती की, त्यांच्या शेताजवळ उभी केलेली मोटरसायकल एमएच 27 एएन 9144 अज्ञात चोरट्याने चोरून नेली. यावरून कलम 379 भादंवि अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता.गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, अजय शालीकराम अडणे (वय 35, रा. तेल्हारा, जि. अकोला) हा चोरीची मोटरसायकल विक्रीसाठी अमरावतीच्या इतवारा परिसरात फिरत आहे. पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले आणि चौकशीत त्याने चोरीची कबुली दिली.

# राम आणि श्रीकृष्णालाही वाचवू शकले नाहीत!

### भाजप राजवटीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरूच | बच्चू कडू यांचा सरकारवर तीव्र हल्ला



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती/यवतमाळ,( दि.13 )–** राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची मालिका थांबत नाही. अचलपूर तालुक्यात एका दिवसात दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार बच्चू कडू यांनी भाजप सरकारवर तीव्र टीका करत गंभीर आरोप केले.

बच्चू कडू अन्नत्याग आंदोलन करत असताना, अचलपूर तालुक्यातील श्रीराम ठाकरे या शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्याच दिवशी, अचलपूरमधील खैरी दोनोडा गावात श्रीकृष्ण वाटाणे या शेतकऱ्याने सावकाराच्या त्रासाला कंटाळून आपलं जीवन संपवलं. या घटनांनी संपूर्ण विदर्भ हादरून गेला आहे.

या आत्महत्या केवळ वैयक्तिक घटना नसून, राज्यातील शेतकऱ्यांची होणारी फरफट आणि प्रशासनाचं अपयश याचं प्रतीक असल्याचं बच्चू कडू यांनी म्हटलं. त्यांनी सरकारला उद्देशून विचारलं, 'राम आणि श्रीकृष्णालाही वाचवू शकत नाही, अशी सत्ताधीशांची व्यवस्था चालावी का?'



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी 'सातबारा कोरा करू' अशी ग्वाही दिली होती. पण आज अनेक शेतकरी कर्जबाजारी आहेत, हमीभाव नाही, बँकांचे नोटिसांचे दडपण आहे आणि सावकारांचा त्रास सुरूच आहे. आश्वासनं दिली गेली, पण अंमलबजावणीत मात्र शून्य आहे, अशी टीका त्यांनी केली.

### हे सरकारच्या धोरणांचं थेट अपयश

बच्चू कडू म्हणाले, 'श्रीराम ठाकरे आणि श्रीकृष्ण वाटाणे यांचा मृत्यू हे सरकारच्या धोरणांचं थेट अपयश आहे. वेळेवर मदत मिळाली असती, तर हे टाळता आलं असतं.' शेतकऱ्यांवरील संकट वाढत चाललं असून, मानसिक तणाव, अपमान आणि आर्थिक विवंचना यामुळे आत्महत्यांकडे वाटचाल होत आहे. 'हा काळा काळ भाजप सरकारने शेतकऱ्यांवर आणला आहे. ही व्यवस्था अक्षम ठरली असून, त्यांना राजीनामा द्यावा लागेल,' अशी संतप्त प्रतिक्रिया कडू यांनी दिली. शेवटी, त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, शेतकऱ्यांनी आता झुकायचं नाही, थांबायचं नाही. सरकार जागं होईपर्यंत संघर्ष थांबणार नाही.

### डोळ्यांवर पट्टी बांधून पदयात्रा

बच्चू कडू म्हणतात, 'सरकारने डोळ्यावर पट्टी बांधली आहे — आम्ही ती फाडायला निघालोय! ना शेतकऱ्यांचे अश्रू दिसतात ना दिव्यांगांची वेदना. हे आंदोलन त्यांच्या डोळे उघडण्यासाठीच आहे.' सभेसाठी निघालेल्या अनेक शेतकरी, दिव्यांग बांधव आणि महिलांनी डोळ्यावर काळ्या पट्ट्या बांधल्या असून, त्यांच्या हातात रूमणं आणि विळी आहेत. हे केवळ प्रतीक नाही, तर शासनाच्या अंधत्वाविरोधातील जाहीर एल्गार आहे. दरम्यान, यवतमाळ जिल्ह्यातील काही गावांमध्ये पोलीस पाटील आणि स्थानिक प्रतिनिधींनी आंदोलन दडपण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. नागरिकांना धमक्या, भीती आणि दबावाखाली सभेला येण्यापासून अडवलं जात आहे. मात्र आता शेतकरी थांबणार नाहीत, संयम सुटला आहे.

## अचलपूर ग्रामीण भागात 'ऊर्जा मित्र दिन' उत्साहात साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.13 )–** महावितरणतर्फे प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी राबविण्यात येणारा 'ऊर्जा मित्र दिन' उपक्रम अचलपूर ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात पार पडला. अचलपूर महावितरण उपविभाग सिटी-1 अंतर्गत असदपूर व कॅम्प उपविभाग अंतर्गत कविठा ग्रामपंचायतीत वीज ग्राहकांच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी विशेष सभा घेण्यात आली. या बैठकींमध्ये ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक, महावितरण अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

असदपूर ग्रामपंचायतीत झालेल्या सभेत उपकार्यकारी अभियंता उमेश राठोड यांनी नागरिकांना वीजसंबंधीच्या अडचणी खुलेपणाने मांडण्याचे आवाहन केले. सहायक अभियंता राजेश गवळी यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि लवकरात लवकर सोडविण्याचे आश्वासन दिले. कविठा ग्रामपंचायतीत झालेल्या बैठकीत कॅम्प उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश बोरीकर यांनी वीजपुरवठा, जळालेले ट्रान्सफॉर्मर, कमी

### वीज समस्यांवर थेट चर्चा

व्होल्टेज, वीज खांब दुरुस्ती अशा विविध समस्यांवर ग्रामस्थांशी चर्चा केली आणि संबंधित तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्याचे सांगितले.या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील वीज ग्राहकांना गावातच अधिकारी व कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे समस्या लवकर सोडवल्या जात असून, गावकऱ्यांनी उपक्रमाचे कौतुक केले. सरपंच मोहन मुंदाणे (असदपूर) आणि बाबा साकूम (कविठा) यांनी उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत असल्याचे सांगितले. या वेळी सहायक अभियंते रजत राऊत, सचिन खरड, राहुल ठाकरे, प्रणव आगरकर, राजेश वैराळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित ग्रामस्थांनी महावितरणच्या या प्रयत्नाबद्दल आभार व्यक्त केले.

## मालखेड रेल्वे अंडरब्रिजखालचा रस्ता धोकादायक स्थितीत

### आमदार अडसड यांचा रेल्वे प्रशासनाला इशारा



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.13 )–** चांदूर रेल्वे तालुक्यातील मालखेड येथील रेल्वे अंडरब्रिजखालचा रस्ता अक्षरश: धोकादायक स्थितीत असून नागरिकांच्या तक्रारींवरून आमदार प्रतापदादा अडसड यांनी शनिवारी प्रत्यक्ष भेट देत रेल्वे अधिकाऱ्यांसह पाहणी केली.

शेतकऱ्यांना आणि सामान्य नागरिकांना होणाऱ्या त्रासाला जबाबदार कोण? असा थेट सवाल रेल्वे अधिकाऱ्यांना विचारत त्यांनी प्रशासनाच्या दुर्लक्षावर जोरदार शब्दांत नाराजी व्यक्त केली.

### वृत्ताची दखल, प्रत्यक्ष पाहणी

'दैनिक महासागर' मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'अपघातानंतरच रेल्वे प्रशासनाला जाग येणार का?' या वृत्ताची गंभीर दखल घेत आमदार अडसड यांनी तत्काळ घटनास्थळी भेट दिली. या वेळी रेल्वेच्या संबंधित अधिकाऱ्यांना देखील उपस्थित राहण्याचे आदेश त्यांनी दिले होते.

### आमदार अडसड यांची स्पष्ट भूमिका

आमदार अडसड यांनी अधिकाऱ्यांना सुनावत म्हणाले,ही स्थिती नागरिकांच्या सहनशीलतेच्या पलीकडे गेली आहे. जर तात्काळ सुधारणा झाली नाही, तर मी स्वत: वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधून तीव्र पातळीवर पाठपुरावा करणार आहे.

### रस्त्याची दुरवस्था – अपघातास निमंत्रण

पुलाखाल मोठमोठे खड्डे, उघड्या सळाख्या, साचलेले पाणी आणि चिखलामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि वाहनचालक यांच्यासाठी जीवघेणे ठरत आहे.पावसामुळे अलीकडेच पुलाची भिंत कोसळल्याचा प्रकार ताजा असतानाही, रेल्वे प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याची बाब यावेळी उघड झाली.स्थानीय नागरिकांनी रेल्वे प्रशासनावर गंभीर आरोप करत सांगितले, दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. कोणाच्या तरी मृत्यूनंतरच हे प्रशासन जागे होणार का?सरपंच लता पाटील यांनीही परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित करत स्पष्टपणे सांगितले,सळाख्या बाहेर आलेल्या आहेत, चिखल आणि दुर्गंधी असह्य झाली आहे. जर लवकर उपाय न केले, तर जनआंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

## एमआयडीसीतील कार्यालयात चोरी

**धाणगाव रेल्वे –** एमआयडीसी परिसरातील जळगाव आर्वी येथील कंपनीच्या कार्यालयाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने 14 हजार 400 रुपयांचा मल चोरून नेला. ही घटना 6 जुलैरोजी दुपारच्या सुमारास घडली. राहुल देविदास वहिले (45) असे फिर्यादीचे नाव आहे. त्यांच्या कंपनीच्या कार्यालयातून अज्ञात चोरट्याने कॉम्प्युटर संच, प्रिंटर, खुर्च्या असा एकूण 14 हजार 400रुपयांचा माल चोरून नेला.

## बॅटरी चोरणारे दोघे अटकेत

**अमरावती –** दोन ऑटोमधील बॅटर्या चोरणार्या दोन चोरट्यांना राजापेठ पोलिसांनी अटक केली आहे. शनिवारी ही कारवाई केली. आकाश काळे (31, दरोगा प्लॉट) आणि साहिल बोरकर (24, दरोगा प्लॉट) अशी अटक चोरट्यांची नावे आहेत. कचरा संकलन करणार्या दोन ऑटोमधील बॅटरी चोरीप्रकरणी कुलदीप चावरे यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी 11 जुलै रोजी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

## हजारोंच्या गर्दीने कौंडण्यपूरला पंढरीचे रूप

### आषाढी एकादशीच ऐतिहासिक सोहळा



**महासागर प्रतिनिधी**

**कौंडण्यपूर,( दि.13 )–** विदर्भातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथे यंदाचा आषाढी सोहळा ऐतिहासिक ठरला. 11 जुलै रोजी दुपारी 12 वाजता रुक्मिणी मातेच्या पालखीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दुपारी चार वाजता पार पडलेल्या दहीहंडी सोहळ्यास हजारोंच्या गर्दीने पंढरपूरची आठवण करून दिली.

या दहीहंडी सोहळ्याला माजी खासदार नवनीत राणा, भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, सौ. गायत्रीताई देशमुख, सौ. यावलीकर, सौ. आरती वानखडे, धीरज केने, तसेच मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. पंढरपूरहून तब्बल 40 दिवसांचा पायदळी प्रवास करून आलेली पालखी रुक्मिणी मातेच्या मंदिरात दाखल होताच, परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. टाळ, मृदंग आणि विठ्ठलनामाच्या जयघोषात भक्तांनी सहभागी होत आनंद साजरा केला. सात दहीहंड्यांतून दह्याचा प्रसाद उधळण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्तांनी विशेष परिश्रम घेतले.



### जणू भगवान श्रीकृष्ण स्वत: आले!

'कौंडण्यपूर कॉरिडॉरच्या दृष्टीने आम्ही विविध उपक्रम राबवत असून, भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. यंदाची गर्दी पाहता कौंडण्यपूरला जणू पंढरीचे रूप आले आहे. जणू भगवान श्रीकृष्ण स्वत: दर्शन द्यायला आलेत, असा अनुभव भाविकांना मिळत आहे,' असे भावनिक शब्दांत प्रतिपादन जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांनी केले.

## न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात




**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.13 ) –** स्थानिक नामांकित सी.बी.एस.ई. शाळा न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूजवळ कृतज्ञता व्यक्त करत, विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे या दिवसाचे महत्त्व उलगडून दाखवले.कार्यक्रमाची सुरुवात विद्येची अधिष्ठात्री देवी माता सरस्वती यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यानंतर शाळेतील विविध वर्गांतील विद्यार्थ्यांनी गुरू-शिष्य परंपरेवर आधारित नृत्यनाटिका सादर केल्या. विशेषत: सहावीच्या विद्यार्थ्यांनी द्रोणाचार्य व एकलव्य यांच्या कथानकावर आधारित सादरीकरणाद्वारे गुरुभक्तीचा आदर्श उदाहरण पेश केला. विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना 'प्रथम गुरू' मानून त्यांनाही कृतज्ञता व्यक्त केली. गुरूंचे केवळ शैक्षणिक योगदानच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील भूमिका अधोरेखित करणारे विचार विद्यार्थ्यांनी मांडले. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नातं हे केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता, त्यांचा आत्मविश्वास, वर्तन आणि जीवनमूल्यांवरही परिणाम करत असल्याचे कार्यक्रमात अधोरेखित झाले. शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ. राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव श्याम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ. राजेंद्र राजोरिया, सदस्य विनय यावलकर, प्राचार्या माधुरी भोंडे, आणि समन्वयक श्वेता गणोरकर यांच्यासह सर्व मान्यवरांनी शिक्षकांना शुभेच्छा देऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन उज्वला खोरगडे यांनी केले. शिक्षिका स्वाती साबरे व सहावीच्या इतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संकल्पनेची सांगड घालून उत्तम मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा मोलाचा सहभाग लाभला.

# महापालिका : निवडणुकीपूर्वी मतदारसंख्येत लक्षणीय वाढ

- 1.65 लाख नवमतदारांची भर
- 15,579 नव्या मतदारांची भर
- एकूण मतदारसंख्या 6.76 लाखांवर
- 850 ईव्हीएम आणि 800 हून अधिक मतदान केंद्रांची शक्यता

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.13 )** – आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील मतदारसंख्येत मोठी वाढ नोंदली गेली आहे. 2017 मध्ये 5.60 लाख इतकी असलेली मतदारसंख्या आता 6.76 लाखांवर पोहोचली असून, गेल्या आठ वर्षांत तब्बल 1.16 लाखांची वाढ झाली आहे. विशेष म्हणजे 2024 च्या विधानसभा निवडणुकीनंतरच 15,579 नवमतदारांची नोंदणी झाली आहे. ही वाढ लक्षात घेता आगामी निवडणुकीत नवमतदारांचे मत निर्णायक ठरू



शकते.राज्य निवडणूक आयोगाने 1 जुलै 2025 पर्यंतच्या मतदार यादीला अंतिम स्वरूप देण्याचे निर्देश दिले आहेत. याअंतर्गत महापालिका प्रशासनाने मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम वेगाने सुरू केले आहे. निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी अमरावती महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा घेतला. मतदान केंद्रांची उपलब्धता, इमारतींची परिस्थिती, मूलभूत सुविधा, मनुष्यबळाची आवश्यकता यासह जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत.

## 850 ईव्हीएम यंत्रांची गरज

2017 मध्ये 85 इमारतींमध्ये एकूण 735 मतदान केंद्रे होती. मात्र आता वाढलेल्या मतदारसंख्येमुळे 800 हून अधिक मतदान केंद्रे आवश्यक ठरणार असून, सुमारे 850 इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) लागणार आहेत. मतदार नोंदणी प्रक्रिया अद्याप सुरू असून, उमेदवारी अर्ज दाखल होईपर्यंत ती चालू राहणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष निवडणुकीच्या आधी मतदारसंख्येत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

## प्रभागनिहाय मतदारयादी लवकरच

आगामी निवडणुकीसाठी यावेळी सुधारित मतदार यादीचा आधार घेतला जाणार आहे. विधानसभा निवडणुकीतील यादी यापूर्वी ग्राह्य धरली जात होती, मात्र यंदा प्रभागनिहाय अद्ययावत यादी तयार केली जात आहे. अमरावती महापालिका क्षेत्रात सध्या 22 प्रभाग आहेत ङ्ग त्यात अमरावती विधानसभा क्षेत्रातील 15 प्रभाग व बडनेरा विधानसभा क्षेत्रातील 7 प्रभागांचा समावेश आहे. बडनेरामधील केवळ शहरी भाग महापालिकेच्या कार्यक्षेत्रात येतो. या सगळ्या घडामोडी पाहता, 2025 मधील महापालिका निवडणूक ही नवमतदारांसह संपूर्ण शहराच्या दृष्टीने निर्णायक ठरणार आहे.

## प्रशासक राजवट संपण्याच्या प्रतीक्षेत

2017 मध्ये झालेल्या निवडणुकीनंतर निवडून आलेल्या नगरसेवकांचा कार्यकाळ मार्च 2022 मध्ये संपला. त्यानंतर महापालिकेत प्रशासक राजवट लागू आहे. आता पुन्हा एकदा निवडणूक होणार असल्याने शहरात नव्या राजकीय नेतृत्वाची निवड होणार आहे.

## तीन टप्प्यांत निवडणुका

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन टप्प्यांत घेण्याचे प्राथमिक नियोजन केले आहे. त्यात पहिल्या टप्प्यात उत्तर व दक्षिण महाराष्ट्र, दुसऱ्या टप्प्यात विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा, तर तिसऱ्या टप्प्यात मुंबई, ठाणे व कोकण यांचा समावेश असेल. विदर्भातील अमरावती दुसऱ्या टप्प्यात येणार आहे.

# युरियाच्या टंचाईमुळे शेतकरी अडचणीत



## मका पेरणीवर गंभीर परिणाम
## शेतकऱ्यांची दमछाक

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी ( दि.13 )**– खरिपाच्या हंगामात मका पीक जोमात असताना चुरणी आणि परिसरातील शेतकरी युरियाच्या तीव्र टंचाईमुळे अडचणीत सापडले आहेत. चिखलदरा तालुक्यात यंदा मक्क्याची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. मात्र, पीक वाढीसाठी अत्यावश्यक असलेले युरिया खत स्थानिक कृषी केंद्रांवर उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पेरण्या झाल्यानंतर शेतकरी खतासाठी कृषी केंद्रांवर चकरा मारत आहेत. तरीही 'साठा नाही' असे उत्तर देण्यात येत असून, यामुळे संतप्त शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. युरिया वेळेत न मिळाल्यास उत्पादनात मोठी घट होईल, अशी भीती अनेक शेतकरी व्यक्त करत आहेत. शेतकऱ्यांच्या मते, चुरणी कृषी मंडळातील अधिकारी या टंचाईकडे दुर्लक्ष करत असून, वेळेवर उपाययोजना होत नाहीत. टंचाईच्या काळात खताचा काळाबाजार वाढत असल्याच्या चर्चा आहेत. त्यामुळे यावर तातडीने नियंत्रण आणून खताचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

> चुरणी कृषी केंद्रावर वारंवार गेले तरी युरिया मिळत नाही. याचा थेट परिणाम मका उत्पादनावर होईल.
> – **नरेंद्र टाले,** शेतकरी, चुरणी.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अधिकाऱ्यांचे मौन


'शेतकरी संकटात असताना कृषी अधिकारी गप्प का?' असा सवाल उपस्थित होत आहे. पीक जोमात असतानाच खताच्या अभावामुळे मका उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो आहे. शनिवारी आमदार केवलराम काळे यांनी याबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधला असून, दोन दिवसांत युरिया उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच ज्या ठिकाणी खताचा तुटवडा आहे, तिथे कृषी अधिकारी युरिया पोहोचवतील, असे आश्वासनही देण्यात आले आहे.

## ठोस कृती करण्याची मागणी

शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांकडे निवेदन देत तातडीने युरिया उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. अन्यथा संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे. आता प्रशासन यावर कितपत जलद पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची 31 पर्यंत मुदतवाढ

**अमरावती** – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी 2025-26 या शैक्षणिक सत्राकरिता विविध मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांनी केले. अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरता यावा, यासाठी अर्ज भरण्याची 31




जुलै पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीचे कृषी भवन वादाच्या भोवऱ्यात

## हरिदास खडे यांची तक्रार



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.13 )** – दर्यापूर तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकरी व शेतमजुरांच्या सोयीसाठी लाखो रुपयांची गुंतवणूक करून उभारलेल्या कृषी भवन या इमारतीचा कारभार सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. भामोद येथील शेतकरी हरिदास सहदेवराव खडे यांनी यासंदर्भात सहाय्यक निबंधकाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

खडे हे दर्यापूर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष असून त्यांनी कृषी भवनमध्ये आपल्या मुलीच्या डोहाळेजेवणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. रीतसर 2000 रुपये भरून त्यांनी कृषी भवन बुक केले. परंतु, इमारतीतील साहित्य व इतर सुविधा वापरण्यासाठी 11,000 रुपये अतिरिक्त रक्कम मागवण्यात आली आणि तीही रक्कम भरल्यावर कोणतीही पावती देण्यात आली नाही, असा गंभीर आरोप खडे यांनी केला आहे.

खडे यांनी यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, उडवाउडवीची उत्तरे मिळाली आणि त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आली, असेही त्यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात असून, शासन व प्रशासन यांच्यातील जबाबदारीचे कोडे नागरिकांच्या मनात निर्माण झाले आहे.दरम्यान, सहाय्यक निबंधक यांच्याकडे लेखी तक्रार दाखल झाल्याने आता प्रशासन काय निर्णय घेते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# शहर स्वच्छता अभियानातून ऐतिहासिक परकोटाची स्वच्छता




## युवक काँग्रेसचा उल्लेखनीय उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.13 )**– अमरावती शहरात ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा असलेल्या स्थळांची दुर्दशा आणि स्वच्छतेकडे होत असलेले प्रशासनाचे दुर्लक्ष लक्षात घेता, युवक काँग्रेसतर्फे विशेष स्वच्छता अभियान राबवण्यात आले. जननायक राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त 19 जूनपासून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाअंतर्गत, आज जवाहर गेट रस्त्यावरील ऐतिहासिक परकोटाच्या परिसरात गांजर गवत व तणकट हटवून परिसराची साफसफाई करण्यात आली.

## परकोट इतिहासाचा साक्षीदार

जुन्या अमरावती शहराचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा असलेला परकोट एकेकाळी सौंदर्यीकरणाच्या कामांमुळे उजळून निघाला होता. तत्कालीन पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या प्रयत्नातून या परकोटाचे सौंदर्यीकरण करण्यात आले होते. मात्र, अलीकडच्या काळात मनपा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे परिसरात गांजर गवत, तणकट, दारूच्या बाटल्या आणि इतर कचऱ्याचा सर वाढला होता. परिणामी परिसरात अस्वच्छता पसरली आणि परकोटाचे सौंदर्य झाकोळले.

## प्रशासनाच्या अनुपस्थितीत युवकांचे स्वयंस्फूर्त योगदान

या परिस्थितीत युवक काँग्रेसने पुढाकार घेत स्वच्छता मोहीम राबवली. प्रशासनाला पूर्वसूचना देऊनही कोणतीही मदत किंवा यंत्रणा न दिल्याने युवक कार्यकर्त्यांनी स्वतःच झाडू, फावडे, ट्रॉलीच्या साहाय्याने परिसरातील गांजर गवत, तणकट आणि कचरा स्वच्छ केला. या उपक्रमामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात आले. या अभियानात परिसरातील नागरिकांनीही मोठा सहभाग नोंदवला. युवक काँग्रेसच्या या उपक्रमाचे स्वागत करत त्यांनी यासारखी मोहिम वारंवार राबवण्याची अपेक्षा व्यक्त केली. स्वच्छता उपक्रमात माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, शहर काँग्रेस अध्यक्ष बबलू शेखावत, माजी नगरसेवक संजय शिरभाते, प्रा. अजय गुल्हाने, युवक काँग्रेस व एनएसयुआयचे समीर जवंजाळ, वैभव देशमुख, अनिकेत ढेंगळे, योगेश बुंदेले, अक्षय साबळे, संकेत साहू, शुभम बांबल, धनंजय बोबडे, निखिल बिजवे, मोहीत भेंडे, श्रेयस धर्माळे, शंतनु देशमुख यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांचे मोलाचे योगदान लाभले.

# दर्यापूर : मॅनेज डेंटरिंग प्रकरणी बिडीओचे जाणीवपुर्वक दुर्लक्ष



## सचिव मोकाट, भ्रष्टाचार सुसाट
## माहिती अधिकारातही दिशाभूल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.13 )**– दर्यापूर पंचायत समितीअंतर्गत काही ग्रामपंचायतींमध्ये विकासकामांच्या टेंडर प्रक्रियेत आणि कामांच्या अंमलबजावणीत मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याच्या तक्रारी वारंवार होत असताना खुद्द गटविकास अधिकारी( बिडीओ) याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे. वारंवार तक्रारी येत असताना या तक्रारिंना गटविजाणीपुर्वक स्थानिक पातळीवरून मोठ्या प्रमाणात येत आहेत.

विशेष म्हणजे, या तक्रारींवर प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. नागरिकांकडून माहिती अधिकार कायद्यानुसार विचारलेल्या प्रश्नांना उत्तरच दिले जात नाही किंवा ती माहिती चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी असते. त्यामुळे प्रकरण अधिकच गंभीर होत चालले आहे. ग्रामस्थांच्या मते, पंचायत समिती अंतर्गत काही ग्रामपंचायतींमध्ये विकासकामांसाठी लाखो रुपयांची कामे मंजूर केली जातात. रस्ते डागडुजी, गटारी, पाणीपुरवठा, सोलर लाईट इत्यादी कामांच्या टेंडर प्रक्रियेतही पारदर्शकता नसून, काही सचिवांनी ठराविक कंत्राटदारांशी संगनमत करून कामे मंजूर केल्याचा आरोप आहे. विशेषत: पनोरा ग्रामपंचायतीसह इतर काही ग्रामपंचायतींमध्ये टेंडरपूर्वीच कंत्राटदार निश्चित केल्याचे तक्रारकर्त्यांचे म्हणणे आहे. अनेक ठिकाणी कामे प्रत्यक्षात सुरूच न करता, ती कागदोपत्री पूर्ण दाखवली गेल्याचे निदर्शनास आले आहे.

## निकृष्ट दर्जाची कामे

काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून शासनाची फसवणूक केल्याची उदाहरणेही आहेत. विकासकामांमध्ये 'क्वालिटी कंट्रोल' ची मोठ्याप्रमाणात उणीव भासत आहे. या सर्व प्रकारांकडे गटविकास अधिकारी (बिडीओ) दुर्लक्ष करत असल्याने ग्रामस्थांनी आता थेट पंचायत समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सिईओ) यांच्याकडे चौकशीची मागणी केली आहे. तक्रारकर्त्यांची स्वतंत्र सुनावणी घेऊन दोषी सचिव किंवा संबंधित कर्मचाऱ्यांवर योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. स्थानिक जनतेचा विश्वास आहे की, सार्वजनिक निधीचा योग्य वापर होण्यासाठी, माहिती अधिकाराला योग्य प्रतिसाद मिळण्यासाठी आणि प्रशासन पारदर्शक होण्यासाठी ही चौकशी अत्यावश्यक झाली


महासागर
दर्यापूर पंचायत समितीअंतर्गत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार
- ग्रामपंचायतींच्या निविदा प्रक्रियांमध्ये अनियमितता
- सचिवांकडून विकासकामांचे टेंडर 'मॅनेज'
- पनोरा ग्रामपंचायतीसह अन्य गावांमध्येही सर्रास प्रकार

पनोरा ग्रामपंचायतीचा आढावा

ग्रामविकासाचा विश्वासघात!

लोकायुक्त व एसीबी मार्फत चौकशीची मागणी

# पालकमंत्र्यांकडील तक्रारींवर जिल्हाधिकाऱ्यांकडे सुनावणी

## 20 तक्रारींवर झाली सुनावणी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.13 )**– पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे विविध ठिकाणी आलेल्या निवेदनांवर जिल्हाधिकारी यांनी आज सुनावणी घेतली. यात तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेऊन संबंधित विभागांना सुचना केल्या. तसेच नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यासाठी दिलेल्या निर्देशांचे पालन करून तातडीने कार्यवाही करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिल्या. पालकमंत्री बावनकुळे आणि त्यांच्या पालकमंत्री कार्यालयात नागरिक भेटी देऊन समस्यांबाबत निवदेन सादर करतात. या तक्रारींवर संबंधित तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. यावेळी तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित विभागाप्रमुखांना उपस्थित राहिल्याने थेट निर्देश देऊन तक्रारीच्या अनुषंगाने नागरिकांचे समाधान करण्यात आले. यावेळी परिविक्षाधिन अधिकारी कौशल्या, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, तहसिलदार विजय लोखंडे आदी उपस्थित होते. आज झालेल्या तक्रारींमध्ये पर्यावरणाची शपथ सर्व शाळांमध्ये देण्यात यावी, यासाठी सर्व शाळांना निर्देश द्यावे. असदपूर बुडीत क्षेत्रातील व्यावसायिकांना मदत करून त्यांच्या व्यापारासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचे मार्गदर्शन मागवावे. तसेच असदपूर-अमरावती बस सेवा नियमित सुरू करण्यासाठी विभागनियंत्रकांना सूचना देण्यात येणार आहे. फेजपूरा येथील अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निर्णयाची आवश्यकता आहे. त्यानुसार योग्यवेळी याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. हनुमान मंडळासाठी लिजवर जागा आवश्यक असल्याने त्यांनी नोंदणीकृत ट्रस्टद्वारे अर्ज करावा, यावर जिल्हास्तरावर गतीने कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. मेळघाटातील वाघाच्या हल्ल्यात नागरिकांचा मृत्यू होत असल्याने याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी प्रभुदास भिलावेकर यांनी केली. याबाबत वन कायद्यानुसार सर्व परवानगी घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या. तसेच मेळघाटात अवैध धंद्यांवर तातडीने कार्यवाही करावी. आवश्यकता भासल्यास तडीपारीची कार्यवाही करावी. त्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे पाठवावा, असे निर्देश दिले. मेळघाटातील खासगी प्रवाशी वाहतूक करणाऱ्या बसेसची स्थिती प्रादेशिक परिवहन विभागातर्फे तपासण्यात येतील. यात आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यात येतील. यासोबत आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

